"फाईल पॅड, फाईल कव्हर्स व पॉकीटे "
या बाबीची दर निश्चितीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग संचालनालय,**
**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**
**आदेश क्रमांक.उसं/भांखस/फाईल पॅड, फाईल कव्हर्स व पॉकीटे/दरनिश्चिती/(७२)/२०१७-१८/** Q-8263
**दिनांक:-** 23 NOV 2017

**वाचा :-१) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग -४, दि.०१/१२/२०१६**
**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि. १३/१०/२०१७ चे इतिवृत्त**

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.१५ नुसार परिशिष्ट-१८ मध्ये अंध व अपंग संस्थानी उत्पादीत केलेल्या वस्तूंना आरक्षण देण्यात आले आहे. सदर संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समितीमार्फत करण्यात येते. त्यानुसार " **फाईल पॅड, फाईल कव्हर्स व पॉकीटे** " या बाबीची सन २०१७-१८ या वर्षासाठी दरनिश्चिती करण्यासाठी **मे. प्रेरणा ट्रस्ट संचालीत अपंग कार्यशाळा, औरंगाबाद** या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने दि.१३/१०/२०१७ रोजीच्या बैठकीत "**फाईल पॅड, फाईल कव्हर्स व पॉकीटे**" या बाबीचे सन २०१६-१७ मध्ये निश्चित केलेले दर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. **फाईल पॅड, फाईल कव्हर्स व पॉकीटे** या बाबीचे निश्चित केलेले दर परिशिष्ट **"अ"** येथील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत. सदर दर हे खालील संस्थांसाठी निश्चित करण्यात आले आहेत.

| **क्र.** | **वस्तूंचे नाव** | **विर्निदेश** | **दर प्रत्येकी (रुपये)** |
|---|---|---|---|
| १ | फाईल पॅड / (केस बोर्ड) | **Case Board** (Item No. d.215) Size 24 cms, & 36 cms.<br>(to be manufactured from specification)<br>a) 91 DKG straw Board of 1887 GSM and size 61 x 86 cms. as per Grade A.<br>b) Strong while ape having a length of 98.5 cm and width of 1.25 cm. It should have a good selage. It should have a wrap of 2/20 and wett. of 2/10 with 48 ends 22 picks per 25.4 cm.<br>c) Superior binding cloth in the size 61 x 10 cm. It should be suitably strengthened by pecting catridge paper on the rough side. It should have 60 ends and 48 Picks per 2.54 mm. and should have a weight of 0.23 Kg. Per sq. Meter.<br>d) While catridge in the size 61 x 10 cms. 100 GSM.<br>e) Paper in the size 35.5 x 23.5 cms. 10 GSM | १४.०० |
| २ | फाईल कव्हर | **File Covers as per (specification)**<br>24 BM Board duly printed with clothing (4"X14") inside and outside | १०.०० |

| क्र. | वस्तूंचे नाव | विनिर्देश | दर प्रत्येकी (रुपये) |
|---|---|---|---|
| | | cloth duly punched leaving a distance of 3" between two punched holes these hiles should be in the entry of the Board.२४x ३६ सें.मी. (बाब क्र.२४ बीएम)<br>२८० जीएसएम आणि किमान चिंधीचे प्रमाण ५० टक्के | |
| ३ | पाकीटे (ब्राऊन) | ९.५cm X ४.५cm प्रती १००० नग | **३८०/-** |
| | | ११cm X ५cm प्रती १००० नग | **४८०/-** |
| | | १०cm X ८cm प्रती १००० नग | **१०५०/-** |
| | | १६cm X १२cm प्रती १००० नग | **१७००/-** |
| ४ | पाकीटे (पांढरा) | ९.५cm X ४.५cm प्रती १००० नग | **३०५/-** |
| | | ११cm X ५cm प्रती १००० नग | **४५०/-** |
| | | १०cm X ८cm प्रती १००० नग | **९५०/-** |
| | | १६cm X १२cm प्रती १००० नग | **१५००/-** |

सदर दरनिश्चितीची विधिग्राहयता दि.३०/०४/२०१८ पर्यंत राहील. सदरचे दर सर्व कर समाविष्टित असून त्यात वस्तू व सेवा करांचा (GST) समावेश आहे. सदर दर खरेदीदाराच्या कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहे.

अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्थांनी स्वत:च उत्पादन केलेल्या वस्तूंचा शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा, व बाजारातून वस्तू विकत घेऊन शासनास पुरवठा करु नये. तसेच सदर संस्थांनी संस्थेच्या अंध व अपंग सभासद व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयानी दिलेले कामे पुर्ण करुन घ्यावेत.

**पुरवठा कालावधी:-** मागणीपत्र मिळाल्यापासून ०६ आठवड्याच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक राहील.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकार कार्यालयाने माल प्राप्त झाल्यावर मालाचे त्वरीत निरीक्षण करावे. निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणीवा/ त्रुटी/ दोष ताबडतोब पुरवठादारांच्या व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या / खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही वस्तू पुरवठ्याच्या तारखेपासून १५ दिवसात करण्यात यावी. मालाचा निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर ९०% रक्कम ०२ आठवडयामध्ये संस्थाना द्यावी व उर्वरित १०% रक्कम सर्व मालाची पोच कार्यादेशानुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकारामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) पुरवठा कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतींच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) पुरवठा कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. पुरवठा होणाऱ्या मालाची/ वस्तूची गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने आवश्यकते नुसार करावी.

सदर संस्थांनी शासकीय कार्यालयात फाईल पॅड, फाईल कव्हर्स व पॉकीटे यांचा केलेल्या पुरवठ्याबाबतचा अहवाल वस्तूनिहाय प्रत्येक महिन्याला मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरीता.**

**प्रति,**

१) मे. प्रेरणा ट्रस्ट संचालीत अपंग कार्यशाळा, सुभेदारी गेस्ट हाऊस समोर, रंगीन दरवाजा जवळ, औरंगाबाद -४३१ ००१.

२) निवड नस्ती.